नवीन प्रशासन भवन इमारतीतील ७ वा मजला (पश्चिम बाजू) येथील जागा महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगास वाटप करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः शाकाजा-१११६/प्र.क्र.१३७/२०१६/२२

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: १० नोव्हेंबर, २०१७

वाचा :

सा.प्र.वि., शासन निर्णय क्रमांकः शाकाजा-१११२/प्र.क्र.८७/२०१२/२२, दि.२४.०८.२०१६

प्रस्तावना :

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.शाकाजा-१११२/प्र.क्र.८७/२०१२/२२, दि.२४.०८.२०१६ अन्वये नविन प्रशासन भवन, ८ वा मजला येथे २४०० चौ.फू. जागेत कार्यरत असलेल्या मराठी भाषा विभाग यांना ७ व्या मजल्यावरील (पश्चिम बाजू) येथील २४०० चौ.फूट जागा वाटप करण्यात आली होती. तसेच ७ वा मजला (पश्चिम बाजू) येथे १०८४ चौ.फू. जागेत कार्यरत असलेल्या नगर विकास विभाग यांना ८ व्या मजल्यावरील (पश्चिम बाजू) येथील १०८४ चौ.फू. जागा वाटप करण्यात आली व उर्वरित जागेपैकी ७७५ चौ.फू. जागा ही रिफ्यूज एरियाकरीता आरक्षित करण्यात आली होती. सदर आदेश रद्द करुन महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगास नवीन प्रशासन भवन इमारतीतील ७ व्या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याअनुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय:

सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक :शाकाजा-१११२/प्र.क्र.८७/२०१२/२२ दिनांक २४.०८.२०१६ याद्वारे रद्द करण्यात येत आहे. नवीन प्रशासन भवन ७ वा मजला (पश्चिम बाजू) येथील २४०० चौ.फूट जागा महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगास वाटप करण्यात येत आहे व तेथे सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या नगर विकास विभागाने तेथील कार्यासने व अभिलेख त्यांना मंत्रालयातील मुख्य इमारतीमध्ये तिस-या मजल्यावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जागेत तसेच विभागास मंत्रालयात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जागेत स्थलांतरीत करुन सदर जागा रिक्त करावी. तसेच सद्य:स्थितीत ८ वा मजला येथे २४०० चौ.फू. जागेत कार्यरत असलेल्या मराठी भाषा विभाग यांना ८ व्या मजल्यावरील (पश्चिम बाजू) येथील १६२५ चौ.फूट जागा वाटप करण्यात येत आहे. व उर्वरित ७७५ चौ.फूट जागा रिफ्यूज एरियाकरीता आरक्षित करण्यात यावी.भविष्यात जागेच्या उपलब्धते नुसार नगर विकास विभाग व मराठी भाषा विभागास आवश्यक असणारी अतिरिक्त जागा उपलब्ध करुन देण्यात येईल.

मराठी भाषा विभागाने त्यांना वाटप करण्यात आलेल्या नवीन प्रशासन भवन इमारतीमधील ८ वा मजला येथील १६२५ चौ.फूट जागा ताब्यात ठेवून उर्वरित ७७५ चौ.फूट जागा रिफ्यूज एरिया करिता रिक्त करावी तर नगर विकास विभागाने नवीन प्रशासन भवन इमारतीतील ७ वा मजला,

(पश्चिम बाजू) येथील कार्यासने व अभिलेख स्थलांतरीत करुन जागा रिक्त करावी.तसेच महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाने नवीन प्रशासन भवन इमारतीतील ७ वा मजला(पश्चिम बाजू) या जागेचा तात्काळ ताबा घ्यावा.

कार्यकारी अभियंता,इलाखा शहर(सा.बा.)विभाग, बांधकाम भवन इमारत, २ रा मजला, २५ मर्झबान पात्रावाला रोड, फोर्ट, मुंबई-०१. यांनी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग व मराठी भाषा विभाग यांना त्यांना वाटप करण्यात आलेल्या नवीन प्रशासन भवन इमारत येथे अनुक्रमे ७ वा मजला (पश्चिम बाजू) व ८ वा मजला (पश्चिम बाजू) येथील जागेचा ताबा संबंधितांना द्यावा तसेच जागेची आखणी करुन द्यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११०१५१७०२१५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Somnath Namdeo Bagul

Digitally signed by Somnath Namdeo Bagul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b01714c1480a47cec5943a1c3c73ea95af053441 8cf92d1ac844331c4116879d, cn=Somnath Namdeo Bagul
Date: 2017.11.15 15:48:49 +05'30'

(सो. ना. बागुल)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य
२. मा.सभापतींचे सचिव/मा.अध्यक्षांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा.अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. आयुक्त,महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग,निर्मल इमारत, नरिमन पॉईट,मुंबई
७. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, २ रा मजला, ई वार्ड इमारत, भायखळा, मुंबई-०८.
११. सह सचिव (का.२२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. उप सचिव (का.१८ (र.व का.)), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. उप सचिव (आस्थापना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१४. उप सचिव (आस्थापना), मराठी भाषा विभाग, नविन प्रशासन भवन, ८ वा मजला, मुंबई-३२
१५. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६. कार्यासन अधिकारी (प्रशासन-४), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१
१८. उप अभियंता, दक्षिण उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एम.टी.डी.सी.समोर, मुंबई.
१९. शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय आवार, मुंबई-३२.
२०. शाखा अभियंता (सा.बां.) बंगलो, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मुंबई-३२.
२१. दूरध्वनी चालिका, महानगर टेलिफान निगम लि., मंत्रालय मुख्य इमारत, तळमजला, मुंबई-३२
२२. निवडनस्ती.